# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००

ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०


**◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ दिनांक :
Ref. No. : PAHSU/BOEE/ Date :

**परिपत्रक क्र. ४७/२०२१**

विद्यापीठ परिपत्रक क्र.४२/२०२१ दि. १०/०७/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व संलनित महाविद्यालयातील प्राचार्य/ प्राचार्या, संचालक/ विभागप्रमुख सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर यांना ऑनलाईन (Online Mode) पध्दतीने परीक्षा सुरु असताना कोणत्याही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास, महाविद्यालयाने व विद्यार्थ्याने संबंधित विषयाचा पेपर झाल्यापासून १० दिवसाच्या आत विद्यापीठास तक्रार pahsuexams@gmail.com या ई-मेल करावी असे कळविण्यात आलेले होते.

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाकडून दि.०१/०८/२०२१ रोजीच्या पत्रात राज्यामध्ये सर्वदूर निर्माण झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे अनेक भागातील वीज पुरवठा, इंटरनेट सुविधा व दळणवळण इ. साधने खंडीत झाली असून यामुळे सद्यस्थितीत विद्यापीठ/महाविद्यालय स्तरावर सुरु असलेल्या पदवी/पदव्युत्तर परीक्षा पार पाडताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत राज्यातील कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता विद्यापीठाने घेणे आवश्यक आहे. त्याकरीता आवश्यकता भासल्यास परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना पुनश्च: परीक्षांचे नियोजन आपल्या स्तरावर तात्काळ करण्यात यावे. असे कळविले आहे.

वरील पत्रात नमूद केल्याप्रमाणे राज्यामध्ये सर्वदूर निर्माण झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिला असेल तर सदर विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती, कागदपत्रासह महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या मार्फत **दि. १२/०८/२०२१ पर्यंत** विद्यापीठ कार्यालयास सादर करावे. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा फॉर्म भरला नाही तसेच एकही पेपर दिलेला नाही अशा विद्यार्थ्यांची माहिती पाठवू नये. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे वरील कारणास्तव एकापेक्षा जास्त पेपर दयावयाचे राहिले असतील त्या विद्यार्थ्यांनी एकाच स्लॉट ( **[Time: 10:00 a.m. to 1:00 p.m.] [only 1 hour out of this slot]) मध्ये पेपर देणे बंधनकारक आहे.**

सदर विद्यार्थ्यांची परीक्षा ही शुक्रवार दि.२०/०८/२०२१ रोजी ([Time: 10:00 a.m. to 1:00 p.m.] [only 1 hour out of this slot]) या वेळेत आयोजित करण्यात येणार आहे. सदरचे परिपत्रक सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणावे. या खेरीज एखादा विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची कृपया नोद घ्यावी.

(डॉ. विकास कदम)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत-वरीलप्रमाणे
जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन /वेळापत्रक/२०२१/ 952
दिनांक : 9 AUG 2021 9 AUG 2021
प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव

१. मा.प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा.संचालक/विभागप्रमुख, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ.
३. परीक्षा व मूल्यमापन विभागातील उपविभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५११००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




● परीक्षा व मूल्यमापन मंडळ ● **Board of Examinations and Evaluation** ●

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/
जा. क्र. पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/वेळापत्रक/२०२०/ 836 दि. दिनांक : Date : 6 OCT 2020

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : दिनांक ६,७ व ८ ऑक्टोबर २०२० रोजीच्या परीक्षेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा घेत असतना Virus attack मुळे Server Crash झाल्याकारणाने दिनांक ६/१०/२०२० रोजीची ऑफलाईलन परीक्षा झाली असून फक्त सर्व अभ्यासक्रमाच्या ऑनलाइलन परीक्षा ही दिनांक २१/१०/२०२० रोजी पूर्व नियोजित वेळाप्रत्रकाप्रमाणे घेण्यात येईल. तसेच दिनांक ७/१०/२०२० व ८/१०/२०२० रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा हया अनुक्रमे दिनांक २२/१०/२०२० व २३/१०/२०२० रोजी पूर्व नियोजित वेळाप्रत्रकाप्रमाणे घेण्यात येतील.

दिनांक ०९/१०/२०२० पासून ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षा पूर्व नियोजित वेळाप्रत्रकाप्रमाणे सुरु राहतील. परंतु Server वर लोड येत असल्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (Engg. Pharmcy & Architecture) परीक्षांची वेळ ही सकळी ११:३० ते ४:३० ऐवजी दुपारी ३:०० ते रात्री ९:०० पर्यंत राहील व पारंपारीक अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या वेळेमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही याची सर्व विद्यार्थी, शिक्षक व परीक्षेशी निगडीत सर्व घटकांनी नोंद घ्यावी.

आपला स्नेहांकित,

**(सीए.श्रेणिकशहा)**
प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ**
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University**
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०



**परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 834
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 5 OCT 2020

## अत्यंत महत्वाचे परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांना कळविणेत येते की, प्रस्तुत विद्यापीठाकडून सुरु करण्यात आलेल्या मार्च/एप्रिल,२०२० च्या ऑनलाईन परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे सुरु आहेत. परंतु सदरील ऑनलाईन परीक्षा रद्द करण्यात आल्याच्या काही खोटया आफवा वेगवेगळया माध्यमातून समोर येत आहेत. ही बाब पुर्णत: चुकीची असून कोणत्याही परिस्थितीमध्ये ऑनलाईन परीक्षा सुरु राहणार राहतील. अशा बातम्या/आफवावर विश्वास ठेवू नये. विद्यापीठाचे अधिकृत आदेशच अंतिम मानावे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाकडून सुरु करण्यात आलेल्या मार्च/एप्रिल,२०२० च्या ऑनलाईन परीक्षा रद्द केल्या जाणार नसून याबाबतची माहिती आपल्या महाविद्यालयातील सर्व परीक्षार्थी, शिक्षक व परीक्षेशी संबंधित अन्य घटकांच्या निर्दशनास आणून दयावी.

**(सी.ए श्रेणीक शहा)**
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संकुले,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

# विद्यापीठाची रविवारपासून सत्र परीक्षा

## एकूण ६0 हजार परीक्षार्थी ; अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाईन नंबर

**सोलापूर, ता. १९ :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाअंतर्गत पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय आणि तृतीय, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्ष आणि फार्मसी व इंजिनिअरिंगच्या तृतीय, चतुर्थ वर्षांच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा रविवारपासून (ता. २४) सुरु होणार आहेत. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने पार पाडली जाणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्रेणिक शहा यांनी दिली. या परीक्षेसाठी सुमारे ६० हजार विद्यार्थी असून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पालाईन नंबर जाहीर केल्याचेही ते म्हणाले.

कोरोनामुळे ऑनलाईन पद्धतीने ही परीक्षा होणार आहे. इंजिनिअरिंग आणि फार्मसीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षांच्या परीक्षा होणार आहेत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यासंदर्भात वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. इंजिनिअरिंग आणि फार्मसीच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला विलंब झाल्याने या परीक्षा मार्च-एप्रिल २०२१ मध्ये होणार आहेत. पदवी प्रथम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षाही मार्च-एप्रिलमध्ये होतील.

या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने विद्यापीठाकडे कन्सेंट फॉर्म भरून देणे आवश्यक आहे. त्यावर सर्व आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात आलेले आहेत. https://ictrd.org/PAHSUFORM/ या लिंकवरून कन्सेंट फॉर्म भरता येणार आहे. कन्सेंट फॉर्म व्यवस्थितपणे वाचून मोबाईल नंबर व ई-मेल आयडी बिनचूक भरून देणे आवश्यक आहे. २२ जानेवारीपर्यंत हा फॉर्म भरता येणार आहे. एकदाच हा फॉर्म भरता येणार आहे.

### हेल्पलाईन नंबर

ऑनलाइन परीक्षा देताना काही अडचणी आल्यास विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून हेल्पलाइन नंबर जाहीर करण्यात आले आहेत. ८४२१०६८४३६, ८४२१२३८४६६, ८४२१२२८४३२, ८४२१९०५६२३, ८४२१९०८४३६, ८४२१३५४५३२, ८०१००८३७६०, ८०१००८५७५९, ८०१००७६६५७, ८०१००९३८३१ परीक्षा देताना काही समस्या उद्भवल्यास या मोबाईल क्रमांकाशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### या पोर्टलवरून देता येणार परीक्षा

pahsu.org या पोर्टलवरून विद्यार्थ्यांना परीक्षा देता येणार आहे. विद्यार्थ्यांनी आपले पीआरएन नंबर यूजर आयडीसाठी वापरून मोबाईल नंबर तसेच ईमेलवर आलेल्या पासवर्डचा वापर करून विद्यार्थ्यांनी परीक्षा द्यावी. सर्व महाविद्यालयांकडेही विद्यार्थ्यांचे युजर आयडी आणि पासवर्ड देण्यात आलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना पासवर्ड मिळाले नाही, अशांनी महाविद्यालयाकडे संपर्क साधावा. पासवर्ड न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी फरगेट पासवर्ड करून नवीन पासवर्ड घ्यावे. परीक्षेसाठी दीड तासाचा कालावधी असून तीन तास स्लॉट ओपन राहणार आहे. काही समस्या असल्यास हेल्पलाईन क्रमांकाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner